FORM-1 A

N.C.R.B.
I.I.F.-1

249

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: आ.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No.: 54, वर्ष Year: 2022, दिनांक Date: 06/12/2022

2. (i) अधिनियम Act: भ्र. प्र. अधिनियम १९८८, कलमे Sections: 10
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections: —

3. (a) अपराधाची घटना: वार सोमवार, तारीख पासून 05/12/22, वेळ ........, तारीख पर्यंत 06/12/22 वेळ ........
   Occurrence of offence: Day, Date from, Time, Date to, Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याचा तारीख 05/12/2022, वेळ ........
   Information received at P.S. Date, Time
   (c) गुन्हा दाखल झालेल्या सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 09122, तारीख 06/12/2022 वेळ 03:30
   General Diary Reference: Entry No., Date, Time

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurrence: (a) Direction and distance from P.S., Chouki/Beat/O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव: सहा. आयुक्त (बाजार विभाग), महात्मा ज्योतिबा फुले मंडई, २२१
   Address of Occurrence Name, No. if any, Ward, Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण: मजला, डॉ. डी. एन रोड, फोर्ट, मुंबई 400 001, राज्य महाराष्ट्र
   Nearest identifiable Place, Village, Post, Taluka, Distt., State
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव —, तालुका —, जिल्हा —, राज्य —
   In case, outside the limit of this Police Station, Taluka, Distt., State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant: Permanent Address.
   (a) नाव Name: धीरज, (b) वडीलांचे / पतीचे नाव Father's /Husband's Name: शामजी गोहिल
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age: ४८ वर्षे, (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय, फोन नं. Phone No.: ९८२१६५६५६८
   (e) पारपत्र क्रमांक Passport No.: —, दिल्याचा दिनांक Date of Issue: —, दिल्याचे ठिकाण Place of Issue: —, (f) व्यवसाय Occupation: मनपा कॉन्ट्रॅक्टर
   (g) धर्म Religion: हिंदू, जात Caste: मेघवाल, जनजात Sub-Caste: —
   (h) पत्ता Address: दोसी एकर्स, ब्लॉसम बिल्डिंग, बी विंग, रूम नं. ९०६ (मजला ?), ९० कांदिवली (?), (Ward, House/Name No., Phone/M. No., Pan No., Card No.)
   रस्त्याचे नाव Road: अशोक नगर (?), मुंबई - 400 ०१०१ (?), Nearest identifiable place, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn. ........
   तालुका Taluka: ग्राम - मैकलेश (?), जिल्हा Distt. - भावनगर, राज्य State - गुजरात, Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
   सुभाष (?) प्रभाकर (?) गुसाळे, वय ५५ वर्षे, धंदा - नोकरी (दुय्यम अभियंता, महात्मा ज्योतिबा फुले मंडई, मनपा, मुंबई) रा. - ८ - ओ / डी विंग, रेवती पार्क, ठाकूर कॉम्प्लेक्स, मागाठाणे मेट्रो स्टेशन जवळ, बोरिवली पूर्व, मुंबई. मो. नं. ९८२१६७५७७४

वरील फिर्यादी नामे धीरेन शामजी गोहिल/४८ वर्षे यांचा आज दि. ०१/१२/२२ रोजी स्वतंत्र पानावर मराठीतून संगणकावर टंकलिखित केलेला जबाब हाच नमूद गुन्ह्याच्या प्रथम खबरी अहवाल म्हणून घेण्यात येत आहे

समक्ष

(शैलेंद्र चव्हाण)
पोलीस निरीक्षक,
लो.प्र.वि. मुंबई.

Dhiren Gohil

जबाब

दि. ०५/१२/२०२२

श्री. धिरज शामजी गोहील, वय ४८ वर्षे, धंदा—व्यवसाय (कॉन्ट्रक्टर), पत्ता:—दोस्ती एकर, ब्लॉसम बिल्डींग, बी विंग, दहावा मजला, रूम नं. १००७, अॅन्टॉप हील, मुंबई — ४०००३७ मोबाईल क्र. ९८२१६५६५६४ आधार कार्ड क्र.९९६५ २५९३ ६५०६.

---

मी वरीलप्रमाणे असुन उपरोक्त नमुद पत्त्यावर माझ्या पत्नीसोबत मागील २ वर्षापासुन राहावयास आहे. मी बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये कॉन्ट्रक्टर म्हणून काम करतो. त्यातुन मिळणारे उत्पन्नावर माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो.

मी कुंधडिया सेवा संघ संस्था, पत्ता— २७/बी, मेघजी बिल्डींग को. ऑप टेनेन्ट सोसायटी, शिवदास चापसी मार्ग, नियन वेलेन्स फ्लोअर मिल, माझगांव, मुंबई या संस्थेचा खजिनदार म्हणून कामकाज पाहतो. नमूद संस्थेकडून भुलेश्वर म्युनिसिपल मंडई मधील चालवित/देखभाल करीत असलेल्या शौचालयाची परवानगी रद्द करण्यासाठी संस्थेच्या नावे सहा. आयुक्त (बाजार विभाग), महात्मा ज्योतिबा फुले मंडई, पहिला मजला, बृहन्मुंबई महानगरपालीका,डॉ. डि.एन. रोड, मुंबई—४०० ००१ यांचेकडून दि. ११/०३/२२ रोजी नोटीस बजाविण्यात आली होती.

नमूद नोटीसच्या अनुषंगाने मी दि. २५/०३/२२ रोजी अपील क्र. ३४६९/२२ अन्वये सिटी सिव्हील कोर्ट , मुंबई येथे अपील दाखल केले होते. नमूद प्रकरणात मा. न्यायालयाने सहा. आयुक्त (बाजार विभाग), महात्मा ज्योतिबा फुले मंडई, पहिला मजला, डॉ.डी.एन.रोड, मुंबई—४०० ००१ यांचेकडे सुनावणीकरिता जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी सहा. आयुक्त (बाजार विभाग), महात्मा ज्योतिबा फुले मंडई, बृहन्मुंबई महानगरपालीका, मुंबई यांचेकडे दि. २५/१०/२०२२ रोजी सुनावणी करिता हजर राहीलो.

नमूद सुनावणीच्या वेळी मा. सहा आयुक्त (बाजार विभाग) यांनी आमचे संस्थेचे बाजूने सकारात्मक अहवाल देवून कुंधडिया सेवा संघ ही संस्था शौचालयाची व्यवस्था चांगली ठेवत असून, नियमानुसार संस्थेस नुतणीकरण करण्यास हरकत नसल्याबाबत निर्णय दिला. नमूद निर्णयाची प्रत देण्यासाठी लोकसेवक श्री. भुषण भुसाणे यांनी माझ्याकडे दि. २२/११/२२ रोजी रू. ४,००,०००/— इतक्या लाचेची मागणी केली. श्री भुसाणे यांना मला लाच देण्याची इच्छा नव्हती. परंतु, मी कामात व्यस्त असल्याने मी आज दिनांक ०५/१२/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे येवून सहा आयुक्त (बाजार विभाग), बृहन्मुंबई महानगरपालीका येथील दुय्यम अभियंता श्री. भुषण भुसाणे यांचे विरूध्द लेखी तक्रार केली.

मी आज रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पोनि शैलेंद्र चव्हाण यांचेसमक्ष हजर होतो. त्यानंतर पोनि चव्हाण यांनी दोन शासकीय पंचांशी व सपोआ लोखंडे यांचेशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून मी दिनांक ०५/१२/२०२२ रोजी केलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि.चव्हाण यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि.चव्हाण यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला.

समक्ष,

( शैलेंद्र चव्हाण ),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Dhiraj Gohil

त्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी आज रोजी पंचांसमक्ष सहा. आयुक्त (बाजार विभाग) यांचे कार्यालय, महात्मा ज्योतिबा फुले मंडई, डॉ. डी.एन.रोड, मुंबई येथील कार्यालयाच्या ठिकाणी माझे तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असुन होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

पो.नि. चव्हाण यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर आम्ही ला.प्र.वि. कार्यालयातुन पोलीस पथकासह निघून एम.टी.एन.एल. बिल्डींग समोर, फॅशन स्ट्रीट रोड, मुंबई येथे थांबलो. त्यानंतर मला पो.नि.चव्हाण यांनी श्री. भुसाणे यांचे सहा. आयुक्त (बाजार विभाग) यांचे कार्यालय, पहिला मजला, महात्मा ज्योतिबा फुले मंडई, डॉ. डी.एन.रोड, मुंबई कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. भालेकर यांचे सह पाठविले असता दुय्यम अभियंता श्री. भुषण भुसाणे यांची प्रत्यक्ष भेट घेतली. त्यावेळी श्री. भुसाणे यांचेशी कामासंदर्भात चर्चा झाली. चर्चेदरम्यान लोकसेवक श्री. भुसाणे यांनी तडजोडीअंती माझेकडे रू. ४,००,०००/— लाचेच्या रक्कमेची मागणी केली, तडजोडीअंती रू. ३,००,०००/— लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यावेळी मी त्यांच्याकडे पैशाची व्यवस्था करण्याकरीता वेळ मागुन घेतला.

त्यानंतर मी पुन्हा एम.टी.एन.एल. बिल्डींग समोर, फॅशन स्ट्रीट रोड, मुंबई येथे उभ्या असलेल्या पोलीस वाहनाजवळ आलो. पो.नि. चव्हाण यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. लोकसेवक भुसाणे याने पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. लोकसेवक याने लाचेची रक्कम तात्काळ मागणी केली असल्याने त्वरीत सापळापुर्व कारवाई करावयाची आहे असे सांगितले. त्याप्रमाणे मला सापळापुर्व कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर माझेकडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. १,००,०००/— (रू. २००० दराच्या ५ भारतीय चलनी नोटा व रू. ५००/— दराच्या १८० भारतीय चलनी नोटा) स्वतःचे ताब्यात घेतल्या. सदर नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. पो.नि.चव्हाण यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझे डोक्यावरून डावा हात फिरवुन पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर पोलीस वाहनात पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावली व सदरची रक्कम निळया रंगाच्या कापडी पिशवीत ठेवून सदरची पिशवी माझे पॅन्टच्या उजव्या खिशात अलगद ठेवली. तसेच मला सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. पो.नि. चव्हाण यांनी माझे शर्टाचे आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून पंच श्री. भालेकर यांचेसह सापळा कारवाईकरीता लोकसेवक भुसाणे यांचे सहा. आयुक्त (बाजार विभाग) यांचे कार्यालय, महात्मा ज्योतिबा फुले मंडई, डॉ. डी.एन.रोड, मुंबई येथे पाठविले. माझे पाठोपाठ

समक्ष,

( शैलेंद्र चव्हाण ),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

पोलीस पथक काही अंतर ठेवून होते. मी लोकसेवक श्री. भुसाणे यांच्या सहा. आयुक्त (बाजार विभाग) यांचे कार्यालय, दुसरा मजला, महात्मा ज्योतिबा फुले मंडई कार्यालयात त्यांचे कक्षात गेलो. सदर ठिकाणी लोकसेवक त्यांचे कामकाज करताना मिळून आले. लोकसेवक भुसाणे यांच्याशी आमचे संस्थेच्या कामासंदर्भात चर्चा केली. चर्चे दरम्यान लोकसेवक यांनी हाताने इशारा करून लाचेच्या रक्कमेची मागणी केली. लोकसेवक भुसाणे यांनी मागितल्यानंतर माझेकडील अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. १,००,०००/– (रू. २००० दराच्या ५ भारतीय चलनी नोटा व रू. ५००/– दराच्या १८० भारतीय चलनी नोटा ) निळ्या रंगाच्या पिशवितून काढून लोकसेवक यांचे समोर धरली असता, त्यांनी त्यांचे उजव्या हाताने स्विकारून सदर नोटा मोजुन त्यांचे उजव्या बाजूचे ड्रॉवरमध्ये ठेवली. लोकसेवक भुसाणे यांनी लाचेची रक्कम घेतल्यानंतर मी सापळा पथकास दिसेल अशा रीतीने माझे डावा हात केसावरून फिरवुन सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकातील अंमलदार यांनी तात्काळ लोकसेवक भुसाणे यांस रू. १,००,०००/– लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले. यातील लोकसेवक भुसाणे यांची पोलीस पथकाने माझे व पंचासमक्ष सॅग बॅगची झडती घेतली असता त्यांच्या सॅग बॅग मध्ये लाचेच्या रक्कमे व्यतिरीक्त अन्य रू. २४,०००/– रोख रक्कम मिळून आली सदरबाबत पो.नि. चव्हाण यांनी लोकसेवक यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी खात्रीलायक माहिती न दिल्याने सदरची रोख रक्कम रू. २४,०००/– पोलीसांनी ताब्यात घेतली.

सदर वेळी पोलिसांनी त्या लोकसेवकास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे संपुर्ण नाव भुषण लक्ष्मण भुसाणे, वय – ४५ वर्षे, दुय्यम अभियंता, सहाय्यक आयुक्त (बाजार) यांचे कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालीका, दुसरा मजला, महात्मा ज्योतिबा फुले मंडई (क्रॉफर्ड मार्केट), डॉ. डी.एन. रोड, मुंबई, रा.ठी. ८/अे, डी विंग, रेवळी पार्क, ठाकुर कॉम्प्लेक्स, मागाठणे मेट्रो स्टेशन जवळ, बोरीवली (पूर्व), मुंबई असे असल्याचे पंचाना व पोलीस पथकास सांगितले.

मी खजिनदार असलेल्या कुंधडिया सेवा संघ संस्थेमार्फत देखभाल करीत असलेल्या भुलेश्वर म्युनिसिपल मुंडई येथील शौचालयाच्या अनुषंगाने दिलेली नोटीस रद्द करण्यासाठी तसेच संस्थेचा परवाना नुतनीकरण करण्यासाठी सहाय्यक आयुक्त (बाजार) यांचे कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालीका, महात्मा ज्योतिबा फुले मंडई (क्रॉफर्ड मार्केट), डॉ. डी.एन. रोड, मुंबई येथील दुय्यम अभियंता श्री. भुषण भुसाणे यांनी माझेकडून दि. ०५/१२/२०२२ रोजी तडजोडीअंती रू. ३,००,०००/– लाचेची मागणी करून रू. १,००,०००/– लाचेची रक्कम स्वत:साठी स्विकारली म्हणुन माझी त्याचेविरूध्द फिर्याद आहे. माझे लोकसेवक श्री. भुषण भुसाणे यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाही.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मला मराठीतुन वाचून समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( शैलेश चव्हाण ),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Dhiraj Gohil

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे — तात्काळ
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) रिकाम्या मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page

—

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य —
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) —

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : —
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

नमूद ता. वे. व ठिकाणी यातील कॉलम नं. ५ मधील आरोपी शुभम लक्ष्मण मुजावे, दुय्यम अभियंता, महात्मा ज्योतिबा फुले मंडई, मनपा, मुंबई यांनी यातील तक्रारदार श्री. [illegible] यांची [illegible], कुटुंबिया [illegible] संस्था, शुक्रवार म्युनिसिपल मंडई येथील गाळ्याच्या अनुषंगाने आलेले यांनी कि. ना दिलेली नोटीस रद्द करण्याकरिता तसेच [illegible] करण्याकरिता दि ५/१२/२२ रोजी ४,००,०००/- रु. ची मागणी करून तडजोडीअंती ३,००,०००/- रु. स्विकारण्याचे कबूल करून पैकी १,००,०००/- रु. लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून कि. नी. आरोपी यांच्याविरुद्ध दिलेल्या फिर्यादीवरून भ्र. प्र. अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही :-** 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : पोलीस निरीक्षक शैलेंद्र [illegible]

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, —

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन —, जिल्हा —, राज्य —.

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ........ Rank ........ No. ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P.S ........ District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

संपूर्ण नाव Name ... [illegible]
पदनाम Rank ... पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र. ला. प्र. वि. मुंबई
Posting,
Code No. of I.O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख —
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. ऑफिस प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**